CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २४५ वा | शनिवार दि. १ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## शिवसेना ठाकरे गटाचा आज मुंबई महापालिकेवर मोर्चा



**मुंबई ।** मुंबई महापालिका मुख्यालयावर धडकणाऱ्या ठाकरे गटाच्या मोर्चाला स्वतः पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत. राज्यात सत्तांतर होऊन महाविकास आघाडीचे सरकार गेल्यानंतर मुंबई महापालिकेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून सातत्याने करण्यात आला आहे. मुंबई महापालिका प्रशासनाच्या कारभारातील भ्रष्टाचाराच्या विरोधात महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढला जाणार आहे.

## न्यूज कॉलम

### बेकायदा गर्दी; सात जणांवर गुन्हा

**धुळे ।** बेकायदेशीरपणे गर्दी करून अपर जिल्हाधिकार्यांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केले. तसेच गुरांची वाहतूक करणारे वाहन रस्त्यात अडवून वाहनचालकास शिवीगाळ केल्याने सात जणांवर देवपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. बिलाडी फाट्याजवळील उड्डाण पुलावर वीस शेतकर्यांसह गुरांचे वाहन रस्त्यावर अडविले. वाहनचालकाला शिवीगाळ व दमदाटी केली. चेतन माळी, दीपक पाटील, रोहन मंगीळकर, सचिन पाटील, संदीप पाटील, आकाश मराठे, गोपाल निकम यांच्याविरूद्ध गुन्हा नोंद झाला.

### वाळूचोरी केल्याने दोघांविरूद्ध गुन्हा

**नाशिक ।** अवैधरीत्या वाळूचोरी केल्याप्रकरणी साक्री पोलिस ठाण्यात दोन संशयितांवर गुन्हा दाखल झाला. अश्विनी देसाई (तलाठी, घोडदे ता. साक्री) यांच्या फिर्यादीनुसार बुधवारी (ता. २८) दुपारी दीडच्या सुमारास घोडदे गावाच्या कान नदीपात्रात वाहनमालक (एमएच १८, एडब्ल्यू ०२२४) सुनील लोटन पाटील व चालक (एमएच १८, झेड २६६६) कन्हया भरत पाटील (दोघ रा. किरवाडे ता. साक्री) यांनी बेकायदेशीरपणे वाळू उपसा केला.

# जुलैमध्ये राज्याचा मंत्रिमंडळ विस्तार होणार : उपमुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

जुलै महिन्यात राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तार होणार. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबतचा निर्णय घेतील, अशी महत्त्वपूर्ण माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. त्यामुळे अखेर राज्याच्या मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त लवकरच निश्चित होणार असल्याचे दिसत आहे. राज्यात सत्तांतर होऊन वर्षभरापूर्वी एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तसंच छोटेखानी मंत्रिमंडळाची स्थापनाही करण्यात आली. त्यानंतर लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होईल, असं सांगण्यात येत होतं. मात्र सत्ता स्थापनेला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरही विस्तार करण्यात आलेला नाही. गेल्या वर्षभरात मंत्रिपदाकडे आस लावून बसलेल्या काही आमदारांनी विलंबावरून जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त केली होती. या आमदारांना अखेर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खूशखबर दिली असून जुलै महिन्यात मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याचं स्पष्ट केलं आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज छत्रपती संभाजीनगर शहराच्या दौऱ्यावर होते. यावेळी ते विमानतळावर आले असता त्यांनी माध्यमांची संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, 'केंद्र आणि राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्ताराचा काही संबंध नाही. केंद्राचा कधी होणार हे आम्हाला माहिती देखील नाही. आम्ही राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारात जास्त इंटरेस्टेड आहोत. राज्यातील अनेक प्रश्न असतात. त्यासाठी केंद्राची भेट घ्यावी लागते. त्याचा पाठपुरावा करावा लागतो. या संदर्भातच अनेक बैठका असतात. त्यामुळे दिल्लीला जावं लागतं,' असं फडणवीस म्हणाले.

राज्याच्या मंत्रिमंडळ विस्ताराबाबत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'मंत्रिमंडळ विस्तार आम्हाला देखील करायचा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबत निर्णय घेतील. मी विश्वासाने सांगतो की जुलै महिन्यामध्ये आम्ही मंत्रिमंडळ विस्तार करू.' दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी जुलैमध्ये मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याचं स्पष्ट केल्याने आता मंत्रिमंडळात कोणा-कोणाचा समावेश होणार, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. कारण भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील अनेक आमदार मंत्रिपदासाठी इच्छुक आहे. या इच्छुकांना मंत्रिमंडळात सामावून घेताना शिंदे-फडणवीसांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तोडीचा एकही नेता सध्या जगात नाही, असा दावा देखील त्यांनी केला. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावरही त्यांनी टीका केली. राहुल गांधी परदेशात जाऊन देशाची बदनामी करत असल्याचे ते म्हणाले. मात्र, राहुल गांधी यांना अमेरिकेच्या वाईट हाऊसनेच प्रत्युत्तर दिले असल्याचे देखील ते म्हणाले. गंगापूर तालुक्यातील २०९ गावांसह त्या गावांमधील वाड्या, वस्त्यांवर डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत प्रत्येक घरात नळ देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या योजनेचा शुभारंभ देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

### शिंदे-फडणवीसांचा दिल्ली दौरा

देवेंद्र फडणवीस आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आहेत. येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही महत्त्वाची माहिती दिली. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी रात्री उशिरा दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या बैठकीत मंत्रिमंडळ विस्ताराचे सूत्र ठरल्याची माहिती आहे.



### निर्णय शिंदे घेणार

बैठकीबाबत माहिती देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याचे अनेक प्रश्न असतात. त्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करावा लागतो. त्यासाठीच काल दिल्लीत महत्त्वाची बैठक झाली. याशिवाय आम्हाला राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्तारही लवकरच करायचा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबत निर्णय घेतील. जुलैमध्ये आम्ही मंत्रिमंडळ विस्तार करू.

### कुणाला डच्चू मिळणार?

दरम्यान, भाजपश्रेष्ठी शिवसेनेच्या काही मंत्र्यांच्या कारभारावर नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आगामी मंत्रिमंडळ विस्तार करताना या मंत्र्यांची हकालपट्टी केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आज पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनीही शिंदे गटाच्या चार मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू दिला जाईल, असा दावा केला आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यांना कोणतीही बातमी मिळाली नाही, तेच लोक अशा बातम्या पेरतात. यात कोणतीही विश्वासार्हता नाही.

### शिंदे गटाला केंद्रातही स्थान?

शिंदे गटाच्या दोन नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार आहे, अशी चर्चा सध्या सुरू आहे. शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनीही शिवसेनेच्या दोन मंत्र्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत, असे वक्तव्य केले. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्राचा मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार, हे आम्हाला माहिती नाही. केंद्राच्या व राज्याच्या मंत्रिमंडळ विस्ताराचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. आम्हाला राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारात जास्त इंटरेस्ट आहे.




# महिला कर्मचाऱ्यांशी अश्लील चाळे; बँक मॅनेजरला भररस्त्यात चोप

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील पारोळा रोड येथे खाजगी बँकेतील मॅनेजर महिला कर्मचारी यांच्यासोबत अश्लील चाळे करत असल्याच्या तक्रारी होत्या. यामुळे ठाकरे गटाच्या महिला शिवसैनिकांनी भर रस्त्यात चोप दिला. धुळे शहरातील खासगी बँकेतील मैनेजर हा महिला कर्मचाऱ्यांना अश्लील चॅटिंग करत होता. इतकेच नाही तर त्या महिलासोबत अश्लील चाळे करत असल्याने बँकेतील महिला कर्मचाऱ्यांनी ठाकरे गट शिवसैनिकांशी संपर्क साधला.

शहरातील ग.नं. ६ पारोळा रोड येथील रिलायन्स लाईफ इन्शोरन्स या खाजगी कंपनीत नितीन सोमनाथ पाटील (३५) रा. निकुंभे, ता.धुळे, ह.मु. हजारे कॉलनी, जीटीपी स्टॉपजवळ, देवपूर, धुळे हा असिस्टंट ब्रँच मॅनेजर म्हणून कामाला आहे. याच कंपनीत एक विवाहित महिलाही नोकरीवर आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तो या महिलेला ऐनकेन प्रकारे त्रास देऊन अंगलट करण्याचा प्रयत्न करत होता. दिवसेंदिवस त्याची हिंमत वाढतच होती. त्यातच त्याने 'मुझे प्यार हो गया' असा मॅसेज महिलेला पाठविला. यामुळे महिलेचा संयम सुटल्याने याबाबत थेट शिवसेनेच्या कार्यालयात तक्रार दिली. त्यानंतर शिवसेनेच्या महिला पदाधिकारी हेमाताई हेमाडे, शुभांगीताई पाटील यांनी शिवसैनिकांसोबत थेट ग.नं.६ मधील कंपनीचे कार्यालय गाठले. आणि असिस्टंट मॅनेजर नितीन पाटील याला कार्यालयातच चोप देण्यास सुरवात केली. त्यानंतर त्याला ओढून आझादनगर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. यावेळी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. आझाद नगर पोलीस ठाण्यात पीआय प्रमोद पाटील यांच्याकडे शिवसेनेच्या रणरागिणींनी कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या ब्रांच मॅनेजरच्या अश्लिल वर्तवणुकीला वैतागून यापुर्वी काही महिलांनी काम सोडल्याचेही सांगण्यात येत आहे. महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बैंकेत जात संबंधित बँक अधिकाऱ्याला ओढून बाहेर आणले. यानंतर भर रस्त्यात चोपून पोलिसांच्या स्वाधीन केले.

# धुळेकरांच्या सेवेत आजपासून शतायु हॉस्पिटल

### अत्यल्प दरात मिळणार सेवा :डॉ.रोहन कुलकर्णी यांची माहिती



**धुळे । प्रतिनिधी**

डॉक्टर दिनाचे औचित्य साधत शहरात उद्या आणखी एक सुसज्ज हॉस्पिटल धुळेकांच्या सेवेत दाखल होणार आहे. धुळे चॅरिटेबल सोसायटीचे १४० खाटांचे शतायु हॉस्पिटल आज ०१ जुलै पासून धुळेकरांच्या सेवेसाठी अत्यल्प दरात सुरू होत आहे. याठिकाणी २५ बेडचा आय.सी.यु. विभाग, ५० बेडचा महिला विभाग तर ६० बेडचा जनरल विभाग असणार आहे. या हॉस्पिटलमध्ये रुग्ण व नातेवाईकांसाठी सुसज्ज सोयी-सुविधा उपलब्ध असून लवकरच शासकीय योजनाही लागू होणार असल्याची माहिती शतायु हॉस्पिटलचे सीईओ डॉ. रोहन कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ.रोहन कुलकर्णी यांनी सांगितले की, धुळे चॅरिटेबल सोसायटीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. आता कमलाबाई अजमेरा आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या दयासागर शैक्षणिक संस्थेच्या प्रांगणात शतायु हॉस्पिटल धुळेकरांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आले आहे. या हॉस्पिटलमध्ये जनरल मेडीसीन, स्त्रीरोग विभाग, एन.आय.सी.यु., पी.आय. सी.यु., आर्थोपेडिक, जनरल सर्जरी, गॅस्ट्रो, बालरोग, अपघात विभाग, न्युरो सर्जरी, जनरल सर्जरी, पॅथॉलॉजी, डायलिसिस सेंटर, नेफ्रोलॉजी, नेत्रविकार तसेच अन्य सुविधा उपलब्ध असणार आहे. विशेष म्हणजे या हॉस्पिटलमध्ये नाशिक येथील प्रख्यात एचसीजी मानवता कॅन्सर सेंटरची ओपीडी दर मंगळवारी १० ते २ या वेळेत सुरू राहील. रुग्णांना औषधी खरेदीची कुठलीही सक्ती नसेल. यामुळे धुळेकरांनी जास्तीत जास्त या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शतायु हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे. डॉ. रोहन कुलकर्णी, डॉ. पंकज महाजन, (एम.डी. मेडीसीन) डॉ. आदित्य जैन (कान, नाक, घसा), डॉ. सुप्रिया कुलकर्णी, डॉ. आकांक्षा बरकसे (एम.एस. स्त्री रोग), डॉ. चिन्मय साळुंखे (एम. एस. अस्थीरोग), डॉ. ऋषीकेश सिंग (नेत्ररोग तज्ञ) डॉ. चेतन चौधरी, डॉ. कौस्तुभ साळुंखे (बालरोग तज्ञ), डॉ. सौरभ निकुंभ, डॉ. राहुल बाविस्कर (जनरल सर्जरी) हे तज्ञ डॉक्टर २४ तास सेवा देण्यासाठी सज्ज असतील, अशी माहितीही डॉ. कुलकर्णी यांनी यावेळी दिली.

# उद्योगांच्या सामूहीक प्रश्नांकरीता चर्चा करण्यासाठी औद्योगिक संघटनांची उद्या निमात बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**

उद्योग तसेच औद्योगिक संघटनांच्या सदस्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर चर्चा करून त्यावर मार्ग काढण्यासाठी जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटनांच्या प्रमुख प्रतिनिधींची बैठक उद्या रविवार दि.२ जुलै रोजी दुपारी चार वाजता निमा हाऊस (सातपूर) येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे आणि सचिव राजेंद्र अहिरे यांनी दिली.

औद्योगिक संघटनांपुढे अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत. त्याचा कणखर आणि संघटितपणे मुकाबला करण्याची गरज असून त्यासाठी किमान सहमती कार्यक्रम आखणेही आवश्यक आहे. औद्योगिक संघटना आणि उद्योजकांचे स्थानिक स्वराज्य संस्था राज्य शासन व केंद्र शासन या स्तरांवर जे विविध प्रश्न आहेत ते विविध संघटना आपआपल्या स्तरावर सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु प्रत्येक संघटनेची मांडण्याची पद्धत वेगवेगळी असल्याने शासन किंवा अधिकारी याचा गैरफायदा घेतात व ते प्रश्न प्रलंबित ठेवतात. त्यामुळे उद्योगांना भेडसावणारे अशा प्रकारचे सामूहिक प्रश्न एकाच व्यासपीठावरून किंवा सर्व असोसिएशनने ते एकत्रितरित्या मांडल्यास त्याचा चांगला प्रभाव पडेल. तसेच त्वरेने ते निकाली निघण्यास त्याची चांगली मदत होईल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

आपले प्रश्न सोडविण्यासाठी जिल्ह्यात औद्योगिक संघटनांचा दबाव गट निर्माण करणेही आवश्यक आहे आणि त्यामुळेच आपला संकल्प सिद्धीस येण्यासाठी दोन जुलैच्या बैठकीस सर्वांची उपस्थिती आणि सक्रिय सहभाग प्रार्थनीय असल्याचेही निमा अध्यक्ष धनंजय बेळे आणि अहिरे यांनी पुढे नमूद केले.




# विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय धुळ्यात व्हावे :उ.बा.ठा.शिवसेना

**धुळे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विभागीय आयुक्त कार्यालय जळगाव येथे करण्याची घोषणा जळगाव येथे 'शासन आपल्या दारी' उपक्रमासाठी आले असतांना केली. त्यामुळे धुळे,नंदुरबार जिल्ह्यावर होणारा सततचा अन्याय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या पार्श्वभूमीवर धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षांनी आपले राजकीय जोडे बाजुला सारुन विभागीय कार्यालय धुळ्यातच व्हावे याकरिता उ.बा.ठा.शिवसेनेच्या पदाधिकार्यांनी जिल्हाधिकार्यांची भेट घेत नाराजी व्यक्त केली. तसेच धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील नेत्यांना राजकीय अस्मीता जीवंत ठेवीत एकाच मंचावर येण्याचे आवाहनही केले आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात निदर्शनेही करण्यात आलीत.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, जळगाव विभागात बुलढाणा जिल्ह्याचा झालेला समावेश हा संयुक्तीक नसून बुलढाणा व जळगाव अंतर कमी म्हणजे १२० कि.मी. एवऐ असले तरी बुलढाण्याची नाळ ही विदर्भाशी जोडली गेली आहे. बुलढाणा शहराचा समावेश अमरावती विभागीय कार्यालयात होतो. बुलढाणा येथून अमरावती येथे जाण्यासाठी दळणवळणाचे साधन म्हणून रेल्वेचा वापर होतो. या कार्यालयाची निर्मिती धुळे येथे झाल्यास दळणवळणाच्या दृष्टीकोनातून ते नंदुरबार व जळगांव जिल्ह्याला संयुक्तीक राहणार असून ते धुळे येथे झाल्यास विकासाचा अनुशेष भरुन निघणार आहे. याप्रसंगी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख महेश मिस्त्री, हिलाल माळी,जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे उ.म.स.सौ.शुभांगी पाटील, महानगरप्रमुख धीरज पाटील, डॉ. सुशील महाजन, कैलास पाटील, नरेंद्र परदेशी, देविदास लोणारी, बाबाजी पाटील, हेमा हेमाडे, डॉ.जयश्री वानखेडे, भरत मोरे, ललित माळी, गुलाब माळी, प्रफुल्ल पाटील, लखन चांगरे, संदिप सुर्यवंशी, सुनिल पाटील, संजय जवराज, विनोद जगताप, जनार्दन मासुळे, नंदलाल फुलपगारे,भटू गवळी, मनोज शिंदे, गुलाब धोबी, नितीन जगताप, तेजस सपकाळ आदी उपस्थित होते.

# तालुकानिहाय दिव्यांग तपासणी शिबिरांचे आयोजन करा : पालकमंत्री भुसे यांच्या सूचना

**नाशिक । प्रतिनिधी**



दिव्यांग व्यक्तींसाठी केंद्र सरकारच्या सहायक उपकरण वाटप योजने अंतर्गत कृत्रिम अवयव व साहित्याचे वाटप करण्यात येते. त्या अनुषंगाने जिल्हा समाज कल्याण विभाग व केंद्र सरकारच्या एलिम्को या संस्थेमार्फत जिल्ह्यात दि.१० जुलैपासून तालुकानिहाय दिव्यांग तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, अशा सूचना राज्याचे बंदरे व खनिकर्म मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात शुक्रवारी(दि.३०) दिव्यांग व्यक्तींना या योजने अंतर्गत तपासणी शिबिरांचे आयोजन करण्याबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत पालकमंत्री भुसे बोलत होते. बैठकीस आमदार दिलीप बनकर, माणिकराव कोकाटे, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ अर्जुन गुंडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी योगेश पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, एलिम्को संस्थेचे प्रादेशिक व्यवस्थापक एस.सेनगुप्ता यांच्यासह संबधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री भुसे म्हणाले, शासन आपल्या दारी या उपक्रमाचा एक भाग म्हणून या दिव्यांग तपासणी शिबिरांचे तालुकानिहाय आयोजन करून ते दि.१० जुलै ते ३१ जुलै २०२३ अखेर पूर्ण करण्यात यावे.जेणेकरून या शिबिरांमध्ये तपासणी केलेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार लागणारे साहित्य लवकरात लवकर उपलब्ध होऊ शकेल. त्याअनुषंगाने कोणत्या तालुक्यात या शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.त्याबाबतचे नियोजन करून तालुकानिहाय तारखा कळविण्यात याव्यात.जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींना या शिबिरांच्या माध्यमातून लाभ होण्यासाठी या तपासणी शिबिरांची मोठ्या प्रमाणात प्रचार प्रसिद्धी करण्यात यावी, असे पालकमंत्री भुसे यांनी यावेळी सांगितले. या शिबिरांच्या आयोजनासाठी गट विकास अधिकारी हे तालुकास्तरीय नोडल अधिकारी म्हणून काम करतील. या दिव्यांग तपासणी शिबिरासाठी लाभार्थ्यांकडे दिव्यांग प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड व लाभार्थ्यांचे छायाचित्र अशी कागदपत्रे आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.तसेच ज्या लाभार्थ्यांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नाहीत, त्यांना शक्यतो त्याच शिबिरात जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत दिव्यांग प्रमाणपत्र देण्याचे नियोजन करण्यात यावे. त्याचसोबतच ज्या लाभार्थ्यांकडे उत्पन्नाचा दाखला नाही, त्यांना महसूल यंत्रणेमार्फत त्याच शिबिरात उत्पन्नाचा दाखला देखील उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात यावे. त्याचप्रमाणे दिव्यांग व्यक्तिंना शिबीरांच्या ठिकाणी आणण्यासाठी वाहतूक व्यवस्था, पिण्याचे पाणी, जेवण या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचनाही पालकमंत्री दादा भुसे यांनी दिल्या आहे.

# बस चालकाच्या प्रसंगावधानामुळे टळली मोठी दुर्घटना

**लासलगाव । वार्ताहर**

स्टेअरिंग मध्ये बिघाड झाल्याने पुणे ते लासलगाव ही धावती एसटी बस थेट महामार्गावरून बाजूच्या खड्ड्यात जाऊन मोठ्या दगडाला धडकली यात बसमधील ७५ ते ८० प्रवाशी बालंबाल बचावले तर काही प्रवाशी किरकोळ जखमी झाले.

पुणे-नाशिक महामार्गावर एकलहरे (ता. आंबेगाव) येथे हा अपघात (दि. २८) घडला. बसचालक निवृत्ती रामभाऊ हांडगे हे पुणे ते लासलगाव ही एसटी बस (एमएच १४ बीटी ४११८) घेऊन लासलगावच्या दिशेने जात होते. या वेळी बसमध्ये ७५ ते ८० प्रवाशी होते. दुपारी सव्वातीन वाजता बस एकलहरे गावाजवळ आली असता बसचालक हांडगे यांना स्टेअरिंग मध्ये बिघाड झाल्याचे लक्षात आले. त्यांनी प्रसंगावधान राखत बसवर नियंत्रण मिळवले तोपर्यंत बस महामार्गावरून बाजूच्या खड्ड्यात जाऊन मोठ्या दगडाला धडकली आणि थांबली. बसचालक हांडगेंच्या प्रसंगावधानामुळे बसमधील ७५ ते ८० प्रवाशांचे प्राण वाचले. हांडगे व वाहक एस. एस. सानप यांनी बसमधील प्रवाशांना इतर बसमधून पुढील प्रवासासाठी रवाना केले. एसटी महामंडळाने जीर्ण झालेल्या बस भंगारात काढाव्यात. नव्या बस खरेदी करून प्रवाशांना चांगली सुविधा देणे गरजेचे आहे.

## ‘बंद’ इंटरनेटची किंमत

पेपर फुटणे रोखण्यासाठी, निवडणूक वा धार्मिक कार्यक्रमांच्या काळात शांतता राखण्यासाठी भारतात इंटरनेट सेवा बंद केली जाते. अशा जागतिक घटनांमध्ये भारताचा वाटा ५८ टक्के असल्याचे ॲक्सेस नाउचे म्हणणे आहे.

गेल्या दोन दशकांत 'इंटरनेट' हे सर्वसामान्य भारतीयांसाठीही एक महत्त्वाचे साधन बनले आहे. दैनंदिन जीवन व कामही इंटरनेटशिवाय करण्याची कल्पनाही आता कोणी करू शकत नाही. एखाद्या उपाहारगृहातून आपल्याला हवा असलेला खाद्यपदार्थ मागवणे किंवा बँकेचे व्यवहार करणे अशा अनेकविध कामांसाठी दररोज कोट्यवधी नागरिक इंटरनेटचा वापर करत असतात. मात्र, भारतात ही सेवा बंद पडण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या मणिपूरमध्ये मेइती व कुकी समाजांत हिंसक संघर्ष सुरू असल्याने तेथे इंटरनेट सेवा बंद आहे. चालू वर्षात १ जानेवारी ते १९ मे या काळात जगात इंटरनेट बंद करण्याच्या ८० घटना घडल्या, त्यापैकी ३३ भारतातील आहेत. हे प्रमाण सुमारे ४० टक्के भरते. ‘ह्युमन राइट्स वॉच’ या संघटनेने दिलेल्या माहितीनुसार जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२२ या काळात राजस्तानमध्ये ८५ वेळा इंटरनेट बंद करण्यात आले. देशातील २८ राज्यांमध्ये हा उच्चांक आहे. इंटरनेट बंद करण्यात दुसर्या क्रमांकावर अरुणाचल प्रदेश अणि महाराष्ट्र व पश्चिम बंगाल संयुक्त तिसर्या क्रमांकावर आहेत. त्यांनी अनुक्रमे आठ व सहा वेळा ही सेवा बंद केली. जम्मू-काश्मीरमध्ये इंटरनेट सेवा किती वेळा बंद करण्यात आली याची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही; पण त्या राज्याशी संबंधित ३७०वे कलम रद्द झाल्यावर तेथे बराच काळ ही सेवा बंद होती.

सावधगिरीचा उपाय?

इंटरनेट सेवा बंद करणार्यांमध्ये बहुतेक देश आफ्रिका व पश्चिम आशियातील आहेत. यादवी युद्धाने ग्रस्त इथिओपिया प्रथम क्रमांकावर आहे. लष्करी राजवट असलेला म्यानमार दुसर्या क्रमांकावर आहे. भारत लोकशाही देश असूनही तिसर्या क्रमांकावर आहे. ‘ॲक्सेस नाउ’ या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेच्या अहवालानुसार इंटरनेट बंद करण्याच्या बाबतीत भारत सलग पाच वर्षे पहिल्या क्रमांकावर आहे. २०१९पासून दर वर्षी इंटरनेटची सेवा बंद करण्याच्या घटना व त्यांची वेळ वाढत आहे. २०२१ मध्ये ८४ वेळा, तर २०२२ मध्ये १०७ वेळा भारतात इंटरनेट बंद करण्यात आले होते. त्यामुळे भारतास इंटरनेट बंद करण्याची राजधानी असे नकोसे बिरूद मिळाले आहे. इंटरनेट वापरण्यासाठी आता पर्सनल कम्प्युटरची गरज भासत नाही. कोठेही नेता येण्याजोगा लॅपटॉप किंवा मोबाइल फोनवरही इंटरनेट उपलब्ध असते. त्याचा वापर कोण, कसा करतो याला महत्त्व जास्त आहे. केवळ चुकीची नाही, तर खोटी माहितीही सर्वत्र पसरवणे तीही कमी वेळात आता इंटरनेटमुळे शक्य आहे. दाक्षिणात्य राज्यांत राहणार्या ईशान्येकडील विद्यार्थी व व्यक्तींमध्ये अशाच प्रकारे भीती निर्माण करण्याची घटना फार जुनी नाही. काही व्यक्तींना जमावाने ठेचून मारण्याची घटना महाराष्ट्रात घडली होती. त्याही मागे इंटरनेटद्वारे त्या व्यक्ती मुले चोरणार्या आहेत, असे पसरवण्यात आले होते. जेव्हा राज्यात सामाजिक, धार्मिक तणाव निर्माण होतो तेव्हा मोबाइलवरील इंटरनेटद्वारे प्रक्षोभक मजकूर, बनावट छायाचित्रे पसरवली जाण्याचा धोका जास्त असतो. अशा बाबी टाळण्यासाठी, तसेच सामाजिक असंतोष वाढू नये यासाठी इंटरनेट बंद करणे सरकारला भाग पडत असावे. मात्र, याचा फटका सामान्य माणसे, व्यापारी, व्यवसाय यांना वेगवेगळ्या पद्धतीने बसतो. काश्मीरमध्ये इंटरनेट बंद होते तेव्हा तेथील व्यावसायिकांना आपला माल इतरत्र पाठवणे अशक्य झाले. बँकाचे व्यवहार, रेल्वे व विमानांमधील जागांचे आरक्षण हल्ली ‘ऑनलाइन’ पद्धतीनेच होतात. इंटरनेट सेवा नसल्याने ती कामे होऊ शकत नाहीत. गरीब लाभार्थ्यांच्या बँक खात्यात सरकारी मदत थेट जमा होण्यासाठी, शेतमालाचे भाव जाणण्यासाठी सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी, आता इंटरनेट आवश्यक झाले आहे. चालू वर्षी जूनच्या मध्यापर्यंत इंटरनेट बंद असण्याने देशाचे सुमारे २५ कोटी ५२ लाख डॉलर्सचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षभरातील हे नुकसान सुमारे १८ कोटी ४३ लाख डॉलर्स एवढे होते. २०१९ पासूनचे नुकसान सुमारे ५ अब्ज डॉलर्स असल्याचा अंदाज आहे. शांतता राखण्यासाठी इंटरनेट बंद करावे लागले तरी त्याची मोठी किंमत देशाला चुकवावी लागत आहे.

# मोदींचे एक पाऊल पुढे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा चांगलाच गाजला. त्यापाठोपाठचे महत्त्वपूर्ण दौरेही चर्चेत राहिले. मोदींच्या या भेटीने भारताला काही उद्योग, बरीच गुंतवणूक आणि महत्त्वपूर्ण करार-मदार मिळाले असले तरी सर्वाधिक महत्त्व जागतिक पटलावर देशाला वेगळी ओळख आणि महत्त्व मिळवून देण्याच्या प्रयत्नांना नवी चालना मिळण्यात आहे. पंतप्रधान मोदींचा या कामातील वाटा अभ्यासण्याजोगा आहे. मोदींचा अमेरिका दौरा समजून घेण्यासाठी भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये गेल्या पाच-सात वर्षांपासून होणारे बदल समजून घेण्याची गरज आहे.



या बदलांमध्ये जी-२० राष्ट्रांचे आणि त्या आनुषंगाने ग्लोबल साऊथ राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणे तसेच या राष्ट्रांच्या समस्या जागतिक पातळीवर मांडणे हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याच बरोबरीने द्विपक्षीय पातळीवर भारताचे अमेरिका, रशिया, युरोपियन युनियन आणि इंग्लंड यांच्याबरोबर सामरिक पातळीवर संबंध सुधारण्याचे प्रयत्नदेखील बघावे लागतील. मोदींच्या धोरणांच्या तिसऱ्या घटकामध्ये दक्षिण आशियाई क्षेत्रामध्ये स्वतःचे स्थान पुन्हा एकदा बळकट करण्याचा प्रयत्न समाविष्ट आहे. या दक्षिण आशियामध्ये केवळ भारताचे शेजारीच नव्हे, तर अधिक व्यापक दक्षिण आशियाई क्षेत्राचा समावेश होतो.

अमेरिका आणि रशिया यांच्याबरोबर सामरिक पातळीवर सहकार्य (स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप) विकसित करण्याचे श्रेय मोदींना जाते. ही प्रक्रिया खऱ्या अर्थाने नरसिंह राव यांच्या कालखंडात सुरू झाली आणि भारताचे धोरण रशियाकेंद्रित न ठेवता अमेरिका आणि पश्चिमी राष्ट्रांशी संबंध वाढवण्याचे प्रयत्न झाले. पुढे काही प्रमाणात वाजपेयी तसेच मनमोहन सिंग यांनी हे काम पुढे नेण्याचा प्रयत्न केला पण त्याला खरा आकार मोदींनी दिलेला दिसतो. रशियाबरोबरील संबंधांबाबत भारतामध्ये अंतर्गत वाद नाही. त्याचे एक कारण भारत आणि सोव्हिएत रशिया यांच्या संबंधाच्या पार्श्वभूमीमध्ये दिसून येते. मात्र अमेरिकेबाबत भारतामध्ये डाव्या विचारसरणीचे विचारवंत टीका करतात. अजूनही बदलत्या जगाचे आराखडे आणि भारताचे बदलते धोरण स्वीकारण्याची तयारी त्यांच्यामध्ये दिसत नाही. नुकत्याच झालेल्या पंतप्रधान मोदींच्या अमेरिकेच्या दौऱ्यादरम्यान पूर्व राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांचे वक्तव्य आणि त्याला भारतात काही घटकांनी दिलेला पाठिंबा हे त्याचे उत्तम उदाहरण असू शकते.

सामरिक सहकार्य ही संकल्पना शीतयुद्धोत्तर काळातील आहे. या संकल्पनेचा अर्थ असा की, तुम्ही दोन राष्ट्रांमध्ये लष्करी करार करत नाही किंवा कुठल्याही राष्ट्राविरुद्ध एकत्र येत नाही, तर केवळ वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये (आर्थिक, लष्करी, राजकीय इत्यादी) सहकार्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करता. अमेरिकेबरोबरील हे सहकार्य वायपेयी तसेच मनमोहन सिंग यांच्या कालखंडापासून आण्विक क्षेत्रात प्रस्थापित केले गेले होते. आता ते अधिक व्यापक होऊन आधुनिक तंत्रज्ञान आणि लष्करी सहकार्य यामध्ये प्रस्थापित केले जात आहे. आज या दोन्ही राष्ट्रांना एकमेकांची गरज आहे ती मुख्यतः दोन गोष्टींबाबत. एक म्हणजे इंडो पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या प्रभावाला सामोरे जाण्यासाठी ही दोन्ही राष्ट्रे एकत्र येऊ शकतात. कारण चीनची वाढती आक्रमक भूमिका केवळ दक्षिण चिनी समुद्रापुरती किंवा भारताच्या सीमेपुरती मर्यादित नाही तर एकूणच आशिया पॅसिफिक क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी आणि व्यापारी क्षेत्रात नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी दिसते. याला सामोरे जाण्यासाठी ‘क्वाड’ ही अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यानची सुरक्षा योजना महत्त्वाची आहे. अलीकडच्या काळात जपान तसेच ऑस्ट्रेलियाने भारताशी सामरिक पातळीवर सहकार्य करण्याचे मान्य केले आहे.

ग्लोबल साऊथच्या चौकटीत विचार केला तर ‘जी-२०’ आणि ‘ब्रिक्स’च्या आधारे भारताने स्वतःची भूमिका मांडण्याचे व्यवस्थित प्रयत्न केले आहेत. याला भारताचे आर्थिक स्थैर्य तसेच तंत्रज्ञानातील प्रगती या दोन्ही बाबी कारणीभूत आहेत. भारताची अर्थव्यवस्था तसेच ब्रिक्सच्या चौकटीमध्ये ही विकसनशील राष्ट्रे आपसातील सहकार्याच्या आधारे जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. आज ‘ब्रिक्स’ या संघटनेमध्ये सहभागी होण्यासाठी अनेक राष्ट्रे उत्सुक आहेत. फ्रान्ससारखे युरोपियन राष्ट्रदेखील ब्रिक्सचा सदस्य होऊ पाहत आहे. ‘ग्लोबल साऊथ’ या संकल्पनेच्या आधारे तिसऱ्या जगाचे प्रश्न जागतिक व्यासपीठावर मांडणे आणि त्या प्रश्नांचा पाठपुरवठा करणे हे कार्य भारत करताना दिसत आहे. केवळ जी-२० च्या चौकटीत नाही तर संयुक्त राष्ट्र तसेच जागतिक व्यापार संघटनेच्या पातळीवरही भारत हे कार्य करत आहे.


मोदींच्या धोरणांसंदर्भातला तिसरा घटक दक्षिण, पश्चिम आणि आग्नेय आशिया या संदर्भातही बघावा लागेल. दक्षिण आशियामध्ये आपले पाकिस्तानबरोबरचे संबंध चांगले नाहीत हे सर्वश्रुत आहे. पाकिस्तानबाबत दहशतवादाविरोधी भूमिका घेण्यासाठी भारताने सर्जिकल स्ट्राईकही केला होता. पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देत असेपर्यंत संबंध पूर्ववत होणार नाहीत, ही आजही भारताची भूमिका आहे. भारताने अफगाणिस्तानबाबतही वेगवेगळ्या पातळीवर पुढाकार घेतलेला दिसत आहे. विशेषतः अफगाणिस्तानच्या विकासाच्या दृष्टीने भारताने वेळोवेळी मदत केली आहे. मोदींच्या काळात भारताचे अरब अमराती, सौदी अरेबियाबरोबरचे संबंध एका वास्तववादी पातळीवर दृढ झालेले दिसतात. हे संबंध वाढवत असताना भारताने इराण तसेच इस्त्रायलशीही स्वतंत्रपणे संबंध ठेवलेले दिसतात. अमेरिकेवरून परत येताना पंतप्रधान मोदींनी इजिप्तला दिलेली भेट आणि तिथे झालेले स्वागत हा त्यांच्या आंतरराष्ट्रीय मान्यतेला मिळालेला एक दुजोरा आहे. आग्नेय आशियासंदर्भात पहिला पुढाकार नरसिंह राव यांनी ‘लूक ईस्ट’ या धोरणांतर्गत घेतला होता. आर्थिक आणि व्यापारी सहकार्य हा त्या धोरणांचा मुख्य पाया होता. मोदींनी त्याच धोरणाला पुढे चालना देत ‘ॲक्ट ईस्ट’च्या चौकटीत सामरिक क्षेत्रात सहकार्याची जोड घातली. या क्षेत्रासंदर्भात विचार करण्यामागे देखील पॅसिफिक क्षेत्रामधील चीनचा वाढता प्रभाव आणि त्याला सामोरे जाण्याची गरज हे कारण असू शकते.

भारताचे युक्रेनबाबतचे धोरण वेगवेगळ्या कारणाने गाजले. सुरुवातीच्या काळात भारताने रशियाला पाठिंबा दिला असून रशियाविरुद्धच्या निर्बंधांमध्ये भारत सहभागी होत नाही, ही टीका अमेरिका तसेच युरोपियन युनियन यांनी केली. मात्र त्याला प्रत्युत्तर देताना भारताने आपली भूमिका स्पष्ट मांडली होती. भारत याबाबत तटस्थ भूमिका घेतो, रशियाला पाठिंबा देत नाही आणि हा संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडवला जावा, ही भूमिका भारत मांडतो, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले होते. भारताने मानवतावादाच्या चौकटीत युक्रेनलादेखील मदत केली आहे. हे युद्ध लांबत गेले तस तसे त्याचे वेगवेगळे पैलू दिसू लागले. या युद्धामध्ये अमेरिका आणि युरोपियन युनियन यांची भूमिका किती टोकाची आहे, हे लक्षात येऊ लागले. तसेच शांततेची बोलणी करण्यासाठी युक्रेन आणि रशिया हे दोघेही तयार नाहीत, ही वस्तुस्थितीदेखील पुढे आली. प्रत्यक्षात युक्रेनने हे युद्ध थांबवण्याच्या दृष्टीने आणि दोन्ही राष्ट्रांमध्ये संवाद करण्याच्या दृष्टीने पुढाकार घ्यावा असे सूचित केलेले दिसते. जागतिक राजकारणाचा विचार करताना एखाद्या देशाची क्षमता आणि त्याचे उद्दिष्ट यामध्ये कुठे तरी सांगड घालण्याची गरज असते. भारताने जागतिक पातळीवर स्वतःचे अस्तित्व वा ओळख प्रस्थापित करण्यास स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच प्रयत्न केल्याचे दिसते. त्या काळी पंडित नेहरूंनी आशिया आणि आफ्रिका यांच्या प्रादेशिक वादाच्या चौकटीत एक स्वतंत्र मत मांडण्याचा प्रयत्न केला. त्या काळातील शीतयुद्धापासून वेगळे राहून स्वतःची ओळख प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी अलिप्ततावादासारखी भूमिकादेखील घेतली. हे प्रयत्न एक वेगळी संकल्पना आणि पर्यायी जागतिक दृष्टिकोन या आधारे केले गेले होते. पण १९६२ च्या युद्धादरम्यान भारताची क्षमता आणि उद्दिष्ट यांच्यातील दरी उघड झाली आणि तेव्हापासून भारतीय नेतृत्वाच्या त्या प्रयत्नांना आळा बसला. पुढे इंदिरा गांधींच्या कालखंडात बांगलादेश युद्धानंतर दक्षिण आशियाच्या चौकटीत भारताने स्वतःला एक प्रादेशिक सत्ता म्हणून प्रस्थापित करण्यात यश मिळवले. तसेच १९७४ मध्ये आण्विक चाचणी करून भारतामध्ये अणुबॉम्ब निर्माण करण्याची क्षमता असल्याचे जगाला सिद्ध करून दाखवले. याचे श्रेय इंदिरा गांधींना दिले पाहिजे. १९९१ नंतर नरसिंह राव यांच्या कालखंडात आर्थिक क्षेत्रात झालेला आमूलाग्र बदल भारताच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. आर्थिक उदारीकरणाच्या आधारे भारताच्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल होऊन त्यानंतरच्या कालखंडात सातत्याने भारताची आर्थिक प्रगती होताना दिसते.

पुढे मनमोहन सिंग यांच्या कालखंडात भारत आणि अमेरिकेदरम्यान आण्विक क्षेत्रात करार झाला; ज्याचे एक वेगळे महत्त्व आहे. हा करार म्हणजे अमेरिकेकडून आण्विक क्षेत्रात एकाएकी मदत येऊ लागेल, असे नसून जागतिक पातळीवर भारताशी आण्विक क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत असणारे निर्बंध उठवले जाण्याला वेगळे महत्त्व होते. म्हणजेच पूर्वी सोव्हिएत रशियावादी आणि त्यानंतर रशियावादी भूमिका घेण्याबाबतचा अट्टहास बदलून भारताचा जागतिक दृष्टिकोन वास्तववादी चौकटीत मांडण्याचा प्रयत्न नरसिंह राव, वाजपेयी तसेच मनमोहन सिंग यांनी केला. त्यामुळेच आता भारत अमेरिकेशीदेखील संवाद करू शकत होता आणि हा संवाद ठेवून भारत कुठले पाप करत नव्हता हे या नेत्यांनी दाखवून दिले. मोदींच्या कालखंडात या सर्व घटकांना अधिक व्यापक आणि ठोस स्वरूप दिले गेले. आज जागतिक पातळीवर मोदींना मिळणारी मान्यता त्यांनी घेतलेल्या वेगवेगळ्या पुढाकारांच्या आधारांवर बेतली आहे. भारताचा मूलभूत हेतू जागतिक व्यवस्थेच्या निर्णयप्रक्रियेमध्ये स्थान मिळावे हा आहे, कारण ती भारताची क्षमता आहे.

**- श्रीकांत परांजपे**
**आंतरराष्ट्रीय संबंधांचे ज्येष्ठ अभ्यासक**

## शब्दकोडे-१०८



आडवे शब्द

१. आजोबांचे वडील ४. माजघरातील भांडण ७. तात्काळ चपखल उत्तर देणारा १२. ठिबकणारा, गळणारा १४. ग्रामीण बोलीत साप-नाग इ. १५. कट्टर १७. पगारपुस्तक २०. त्या प्रमाणे २२. महामार्गावरील खाद्यसंस्कृतीचे उगमस्थान २३. रत्न (हिंदी) २८. पालिकेचा प्रवेशकार २९. जून, निबर ३१. कौतुकाचे भरते ३३. बगीचा ३४. बनकर ३६. '--खावे लोखंडाचे, तेव्हा ब्रह्मपदी नाचे' ३७. शोभणारा ३८. चर्चा, भांडण, बोलाचाली ४०. जवळ (हिंदी) ४२. खिशाला बसल्यास खर्च, खाल्ल्यास चटकदार ४३. जहाजांचा धक्का ४५. मोठी टोपली ४६. मोठ्या शिस्तीचा ४७. त्याप्रमाणे ४८. नवऱ्याचा भाऊ ५०. पोते शिवण्याची जाड सुई ५१. सेवक, भक्त ५२. 'दिडदा दिडदा' वाजणारे वाद्य ५४. या आशयाच्या कुंतीच्या आज्ञेने द्रौपदी पांडवांची पत्नी झाली ५५. सावध राहण्याचा इशारा ५७. धान्य असल्यास ढीग, ज्योतिषात फक्त बारा ५८. दंड, शिक्षा ५९. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ६०. मराठीत वडील ६२. सभ्यतेच्या मर्यादा पाळणारा ६४. दुबळा, गरीब ६५. लाकूड छिलण्याचे हत्यार ६६. धाप ६९. सरकारी असल्यास या सुट्टीचे अनेक प्रकार ७०. पांडवांची नावे ७६. शकुनीचे कौरवांशी नाते ७७. सापडल्यास मार्ग, लागल्यास बट्ट्याबोळ! ७८. संताप ८०. दर तासातील प्रमाण ८१. अर्धवर्तुळाकृती रचना, बाक ८२. व्यवस्था बघणारा ८३. बूड, मुक्काम ठोकणे

उभे शब्द

१. बक्षिसाचा बिल्ला, शौर्यचिन्ह २. देवीच्या नावे मागितलेली भिक्षा ३. लोकमान्यांचे नाव ५. रामदासस्वामींच्या निवासाने पुनित झालेला किल्ला ६. सगळीकडे ७. मक्केची यात्रा ८. नेतृत्वाला समाजातून असणारा पाठिंबा ९. आवाज, ध्वनी १०. अटीची भाषा ११. पुंगी (हिंदी) १३. धूर्त, लबाड १६. वाघाची ललकारी १८. ही आवाजाची असते आणि पानाचीही! १९. ललाट २१. जमिनीच्या मालकी हक्काचा सरकारी दाखला २५. एकदम स्वच्छ २७. पर्वत २८. अधिक लोकांना एकत्र जमण्यास मज्जाव करणारा कायदा ३०. राखणीला असलेला ३१. पुण्यात केवळ वास्तव्याने हे बिरूद मिळते असे नाही! ३२. जेमतेम ३५. हाक ३८. प्रहार, घाव ३९. रंगणारे पान ४१. पद्धतीनुसार ४४. दार ४६. मजबूत, भक्कम ४९. नियम सिद्ध करणारा ५१. नाना-नानीचे व्याही ५३. प्रज्ज्वलीत, तापलेले ५६. पाणकोंबडा ५८. अमजद अली खान यांनी लोकप्रिय केलेले वाद्य ५९. बाई, स्त्री ६१. पूर्वज ६३. प्रेमिकांसाठी हृदयाचे प्रतीकचिन्ह ६७. मेण देणारी माशी ६८. श्रीमंत ६९. वर्दळ, राबता ७१. भयंकर ७२. न थांबता, अखंडपणे ७३. अभिनेता ७४. गायनातील तान ७५. वर-वधूची मिरवणूक ७६. जननी ७९. आग्रह, भीड

### शब्दकोडे १०७ चे उत्तर

आडवे उत्तर
१.जोपासना ४.सहवास ७.जपान १०.खडी ११.मांजर १३.जन्मदिवस १६.चव १७.मतलब १८.भग १९.नयन २०.कर २१.नगर २१.तयारी २२.वदन २३.छे २६.पदर २८.तळी २९.शीतल ३०.धडपड ३२.यंदा ३३.रम ३५.यजमान ३७.पार्वती ३९.स्तवन ४०.नगरसेवक ४२.अचानक ४४.नरवर ४६.नकलाकार ४८.साव ४९.माता ५०.कसा ५२.लाल ५३.कोरडा ५४.राधा ५५.पारंगत ५७.सातवाहन ६०.ममता ६२.जेता ६३.वासर ६४.मणेर ६६.डहाळी ६७.काना ६८.हडळ ६९.क्षालन ७१.सदाचार ७२.कोर ७३.कसर ७५.चमत्कार ७६.वादक ७७.पाटलोण ७८.पादत्राण ७९.शाई ८०.रुमाली

उभे उत्तर
१.जोखड २.पार ३.नामांतर ४.सरबत ५.करकरीत ६.अवयव ८.पालक ९.नवरस १२.जल १४.दिन १५.सनदशीर १८.भरीत १९.मगर २२.नद २५.नतमस्तक २६.पसायदान २७.आड २८अ.निंदा ३०.धनगर ३१.पडसे ३४.मनकवडा ३६.मानवता ३७.पाककला ३८.नाचा ४१.वन ४२.अरण्यवास ४३.नफा ४५.रमधाम ४७.लालन ४८.सारवणे ५०.करंगळी ५१.साग ५४.रामरक्षा ५६.तजेलदार ५८.तवाना ५९.हरहर ६१.ताडन ६४.मळकट ६५.रणरण ६७.कारवाई ७०.लवाद ७२.सत्कार ७२.कोकरु ७४.सलोखा ७५.चण ७७.पाली

## मुलींनो आंधळं प्रेम करू नका!

चुकीच्या व्यक्तीवर आंधळा विश्वास, प्रेमाची आणि एकत्र जीवन जगण्याची, लग्नाची, लिव्ह इन रिलेशनशिप बाबतीत स्वप्नाळू आणि भ्रामक कल्पना, त्यातून घेतलेले चुकीचे निर्णय, आई-वडिलांना न जुमानता स्वतःचं भविष्य पणाला लावून शेवटी अतिशय हृदयद्रावक रितीने संपलेल्या अनेक तरुण मुली

आजमितीला देशभरात अशी प्रकरणं पेटलेली आहेत. आजपर्यंत अनेक मुली खोट्या, फसव्या प्रेमाच्या आहारी जाऊन बळी गेल्यात, तरीही आजसुद्धा अनेक मुली त्याच चुकीच्या वाटेवर जाताना दिसतात. या लेखामार्फत आजच्या समस्त तरुण मुलींना एकच सांगणं आहे की, आपलं अतिशय सुंदर, छान आयुष्य, आपलं व्यक्तिमत्त्व, आपलं करिअर, आपलं कुटुंब, आपलं घर, आपले आई-वडील, भावंडं, नातेवाईक, अत्यंत जवळचे आणि खरे मित्र-मैत्रिणी याहून प्रिय आणि महत्त्वाचे जगात काहीही नाही. सर्वात महत्त्वाचे आपलं घर, आपलं गाव, आपलं शहर. तिथे तुमच्यावर आई-वडिलांची सावली आहे, सुरक्षा आहे, संरक्षण आहे, मायेची ऊब आहे. तेथून कायमस्वरूपी बाहेर पाय टाकताना थोडा तरी विचार करा. कोणत्याही मुलीला तरुण वयात, किशोर वयात मुलांना पाहून विशिष्ट भावना, हुरहूर, जवळीक, शारीरिक आकर्षण निर्माण होणे अतिशय नैसर्गिक आहे. पण याला प्रेम, खरं प्रेम समजण्याची गंभीर चूक जेव्हा मुली करतात आणि कसलाही विचार न करता त्यात वाहवत जातात, आपलं कुटुंब, करिअर पालक याही पलीकडे त्यांना कोणी दुसरा महत्त्वाचा वाटतोय? असं का होत?


खरं तर अनेकदा संपूर्ण आयुष्य गेलं तरीही खरं प्रेम कोणालाच मिळालेलं नसतं, मिळत नसतं. खूप कमी उदाहरणं अशी असतील जिथे प्रेमविवाह शंभर टक्के यशस्वी झाले असतील, ठरवून केलेल्या लग्नाची पण फारशी वेगळी परिस्थिती नाही. अनेकदा रितसर केलेली लग्ने सुद्धा तडजोड असतात. समाज, कुटुंब यांच्या दबावाखाली ती रेटून नेलेली असतात. बाहेरील समाजात सुरू असलेले विवाहबाह्य प्रकरणे, सातत्याने बॉय फ्रेंड्स, गर्ल फ्रेंड्स बदलण्याची तरुणांमधील फॅशन, विवाहितांच्या आत्महत्या, घातपात, बलात्कार, विनयभंग, वाढते वेश्या व्यवसाय, छेडछाडीची प्रकरणं, महिलांचे कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण, एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले, मुलींना अश्लील व्हीडिओ, मेसेज यातून ब्लॅकमेल करणे, मुलींची सामाजिक बदनामी होईल असे वर्तन करणे, यातून समाज कोणत्या थराला जात आहे, याची पूर्ण कल्पना तरुण मुलींना असणे आवश्यक आहे. **क्रमशः**

**- फॅमिली काऊन्सलिंग: मीनाक्षी जगदाळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**‘लक्ष महाराष्ट्र’ नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मुंबई नाक्यावर फुले दाम्पत्यांचे पुतळे बसविण्यासाठी कार्यवाही करा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू

## अ.भा. महात्मा फुले समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून मनपा प्रशासनाला इशारा





**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरातील मुंबई नाका परिसर (सावित्रीबाई फुले चौक) येथील मुख्य चौकात फुले दाम्पत्यांचे पुतळे बसविणेबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मनपा प्रशासनाला दिला आहे. काल समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शिष्टमंडळाने मनपा प्रभारी आयुक्त भाग्यश्री बनायात यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, प्रदेश पदाधिकारी नानासाहेब महाले, प्रदेश चिटणीस समाधान जेजुरकर, निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, शहराध्यक्ष कविता कर्डक, राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, समता परिषदेच्या महिला शहराध्यक्ष आशा भंदुरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे, शहर सरचिटणीस संजय खैरनार, शशी हिरवे, मकरंद सोमवंशी, नाना पवार, अक्षय परदेशी, अमोल नाईक, रवींद्र शिंदे, मीनाक्षी काकळीज, कृष्णा काळे, त्रिभुवन, गिरीश बच्छाव, पुष्पलता राठोड, चैतन्य देशमुख, प्रशांत वाघ, रितेश केदार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, थोर समाजसुधारक क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य भावी पिढीला मार्गदर्शक ठरावे आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करणेसाठी सावित्रीबाई फुले चौक, मुंबई नाका येथील मुख्य चौकात त्यांचे ब्रांझ धातूमधील संयुक्त पुतळे बसविण्याबाबत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने वेळोवेळी केलेली मागणी आजतागायत प्रलंबित आहे. या पुतळ्यांसाठी महानगरपालिकेच्या २०२२-२३ व २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे या पुतळ्यांसाठी आवश्यक असणारे सर्व विभागांचे ना हरकत दाखले नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत. तसेच नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्या ठराव क्र.१३४ दि. १४.०३.२०२३ रोजी महासभेने ठराव मंजूर केलेला आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अजूनही सदर चौकात पुतळे बसविण्यात दिरंगाई होत असल्याबाबत लक्ष वेधले आहे.

# गोविंदनगरमध्ये रस्त्याच्या खडीकरणासाठी भर पावसात नागरिक रस्त्यावर उतरले



### शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनचे आंदोलन

**नाशिक । प्रतिनिधी**

गोविंदनगर, मंगलमूर्तीनगर, जगतापनगरसह प्रभाग २४ मधील गॅस पाईपलाईनमुळे उखडलेल्या रस्त्यांचे खडीकरण करा, चिखल हटवा, पाण्याचा निचरा करा आदी मागण्या करीत गोविंदनगरमध्ये शुक्रवारी भर पावसात रहिवाशी रस्त्यावर उतरले. महापालिका उपअभियंता हेमंत पठे यांच्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. समस्या न सुटल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने दिला आहे.

प्रभाग २४ मध्ये गॅस पाईपलाईनमुळे उखडलेल्या काही रस्त्यांचे अद्यापही खडीकरण झालेले नाही. ठिकठिकाणी साचलेले पाणी व चिखल यामुळे दुचाकी घसरत आहेत. नागरिकांना रस्त्यावरून चालणे मुश्कील झाले आहे. ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी खडीकरणाचे सुरू काम अचानक बंद करण्यात आले, अपूर्ण सोडण्यात आले. या आंदोलनात बाळासाहेब मिंधे, संगीता देशमुख, दिलीप जगताप, सुभाष कावेडे, शिवदास शिंदे, प्रदीप विसपुते, जयंत देशमुख, बाळासाहेब देशमुख, हेमंत पारीख, चंद्रशेखर आढाव, रमेश पाटील, अशोक देवरे, सुदाम निकम, अशोक पालवे, शिवाजीराव वर्पे, डॉ. शितल हिरण, रूपक मैंद, स्नेहलता सोनवणे, आरती जोशी, योगिता पारीख, सुनीता बागुल, मनिषा कुंभारे, स्मिनल शिंदे, सं. तु. पानसरे, सुनीता वर्पे, दिपा जगताप, संध्या संधान, मंगला पाटील, प्रतिभा देशमुख, हेमा मैंद, शोभा बागुल, शिवदास शिंदे, संजीव वानखेडे, जयेश वर्पे यांच्यासह गोविंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व रहिवाशी सहभागी झाले होते. एक तासानंतर महापालिका बांधकाम विभागाचे उपअभियंता हेमंत पठे, शाखा अभियंता जगदीश रत्नपारखी हे या ठिकाणी हजर झाले. गोविंदनगर, मंगलमूर्तीनगर, जगतापनगर, कर्मयोगीनगर, कालिका पार्क अशा संपूर्ण प्रभाग क्रमांक २४ मधील रस्त्यांचे खडीकरण करण्यात येईल व इतर समस्या सोडविण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. दखल घेतल्याबद्दल महापालिका अधिकार्यांचे आभार मानण्यात आले.

# रोटरी क्लबतर्फे मविप्र संस्थेच्या ४०० विद्यार्थ्यांना मोफत चष्मा वाटप

**नाशिक । प्रतिनिधी**




मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक व रोटरी क्लब नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने मविप्र संस्थेच्या छताखाली 'होरायझन अकॅडमी' च्या सभागृहात मविप्र शिक्षण संस्थेचे सरचिटणीस अॅड.नीतीन ठाकरे यांच्या हस्ते मोफत चष्मा वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यात संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र नाशिक येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या गटाने मोलाचे सहकार्य दिले. संस्थेच्या जनता विद्यालय लहवित, जनता विद्यालय सातपूर, सीएमएस स्कूल मखमलाबाद, होरायझन अकॅडमी सीबीएसई नाशिक, होरायझन अकॅडमी आयसीएसई नाशिक, उदोजी होरायझन नाशिक इत्यादी विविध शाळेतील ४०० विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाद्वारे लाभ मिळाला.

कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे शिक्षणाधिकारी प्रा.बाळकृष्ण पाटील यांनी केले. याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रफुल्ल बरडीया, सचिव ओमप्रकाश रावत, संचालक प्रणव गाळगीळ, रोटरी क्लबचे वैद्यकीय कामकाज प्रमुख दमयंती बरडीया इत्यादी उपस्थित मान्यवरांचा सत्कार सरचिटणीस अॅड.नीतीन ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

प्राचार्य एल.डी.आवारे, सोनावणे आदी उपस्थित होते. येत्या काळात रोटरी क्लबच्या वतीने १ हजार चष्मे वाटपाचा मानस असल्याचे यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रफुल्ल बरडीया यांनी सांगितले.

# नाशिक कॅम्ब्रिज येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नाशिक ।** विद्यार्थ्यांना घडविण्यात शिक्षकाची भूमिका पालकासारखी महत्वाची असते आणि ही भूमिका योग्य रीतीने निभावल्यास अनेक गुणवंत तयार होतात. गुणासोबत उत्तम व्यक्ती आणि देशाचे सुजाण नागरिक आपण कसे होऊ या कडे देखील विध्यार्थ्यानी लक्ष द्यावे, असे आवाहन रामबंधूचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत राठी यांनी केले. ते नाशिक कॅम्ब्रिज येथे आयोजित १० वी व १२ वी तील गुणवंत विध्यार्थ्यांच्या सत्कार सोहोळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी शाळेच्या विश्वस्त भारती रामचंद्रन, राहुल रामचंद्रन. माध्यम आणि जनसंपर्क तज्ञ डॉ .अभिजित चांदे, मुख्याध्यापक शुन्मुगसुंदर, उपमुख्याध्यापिका विजया रहाणे, शाळेचे माजी विद्यार्थी आदिनाथ चौधरी आणि डॉ .श्रेय सामंत हे उपस्थित होते.

# संत शिरोमनी नामदेव महाराज मंदिरात आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**लासलगाव । वार्ताहर**



लासलगाव येथील संत नामदेव महाराज मंदिरात आषाढी एकादशी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.पहाटे श्री पांडुरंग,माता रूक्मिनी,संत नामदेव महाराज आणि श्री हनुमंताच्या मुर्तीचा महाअभिषेक करण्यात आला.गायत्री डचके,सुनील डचके आणि स्वरांजली बकरे,मनोज बकरे यांच्या हस्ते पुण्यवाचन,पाद्यपुजा आणि महाआरती संपन्न झाली.

या वेळी अध्यक्ष अरविंद टापसे, उपाध्यक्ष सुधीर झांबरे, सचिव सुनील डचके, सुरेश पवार, अनिल बकरे, गोटू बकरे, निलेश लचके, संजय बकरे, रवींद्र लचके, सागर खांबेकर, बाळासाहेब बकरे, योगेश बकरे, सागर डचके, भास्करगुरुजी जोशी, मयूर गुरुजी भंडारी, ऋषिकेश जोशी, गोदावरी बकरे, उषा पवार, हिराबाई बकरे, योगिता झांबरे, संगीता झांबरे, मालती लचके, मीना बकरे आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


अॅड. ज्योत्स्ना पाटील, धुळे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७५१/२०२३

सुमनबाई राजधर चव्हाण ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ........**सामनेवाला**

**कै.राजधर कौतिक चव्हाण** मयताचा पत्ताः-मोहाडी, ता.जि.धुळे दि. २०/०७/२००९ ........**मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं १ ते ५ यांनी कै. राजधर (राजाराम) कौतिक चव्हाण यांचे कायदेशीर वारस आहे. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं २ यांचे कोर्टात दि.०४/०८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकिलामार्फत/प्रतिनिधीमार्फत हजर राहून सदरकामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे- न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जात नं १ ते ५ यांना कै. राजधर (राजाराम) कौतिक चव्हाण यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कुणाचीही काहीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस कोर्टाच्या सही/शिक्यानिशी आज दि. २७/०६२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २७/६/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,धुळे**
**सहायक अधिक्षक** — **दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,धुळे**

---

प्रोसेस जमा — अॅड.राहूलकुमार बी.जाधव
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अ.नं.४३६/२०२२

१) श्री. राजु हरी भिल, वगैरे- ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कुणीही नाही** ........**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप, सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. १६/१२/२०२२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडिल नामे कै. हरी कथ्थु भिल यांचे दि. २४/०१/२००८ रोजी मौजे निजामपुर, ता. साक्री जि. धुळे येथे निधन झाले आहे. तसेच अर्जदार नं. १ ते ४ यांची आई नामे कै. राधाबाई हरी भिल यांचे देखील दि. १९/७/२०१५ रोजी मौजे निजामपुर ता. साक्री येथे मयत झालेल्या आहेत तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते/संबंध |
|---|---|
| १) श्री. राजु हरी भिल | - मुलगा |
| २) मंगलबाई हरी भिल | - मुलगी |
| ३) श्री. बजरंग हरी भिल | - मुलगा |
| ४) सौ. लक्ष्मीबाई हरी माळीच (भिल) | - मुलगी |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. ११/८/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

(शिक्का)

**कामगिरी लिपीक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**
**सहा. अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

---

प्रोसेस जमा — अॅड. अक्षय ऐ. सगर
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी कि. अर्ज क्र.१७०/२०२३

श्रीमती लताबाई भटु मोहिते यै. उ.व. ५८, धंदा - घरकाम
रा. दिघावे, ता. साक्री जि. धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही** ........**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री येथे दिनांक १९/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै.भटु वामन मोहिते यांचे दिनांक ०४/०१/२०२२ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत,

१) श्रीमती लताबाई भटू मोहिते
२) सौ. संगिता भ्र. विश्वास गरुड
३) सौ. निर्मला भ्र. रमेश सोनवणे
४) सौ. सिमा भ्र. योगेश ढिवरे
५) श्री. समाधान भटु मोहिते
६) श्री. दिपक भटु मोहिते

मयतांस वरील प्रमाणे वारस असून, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली त्या अर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश के. तर यांचे न्यायालयात दिनांक ०२/०८/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धीत दिल्ली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- / / २०२३

(शिक्का)

**कामगिरी लिपीक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**
**सहा. अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

---

प्रोसेस जमा — अॅड. तुकाराम एन. मासुळे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ७४१/२०२३

१) सुनिता प्रदिप अहिरे उ.वय-३४, धंदा- घरकाम,
२) विजय प्रदिप अहिरे(अ.पा.क.आई) उ.वय-१६, धंदा-शिक्षण
३) कुणाल प्रदिप अहिरे(अ.पा.क.आई) उ.वय-१४, धंदा-शिक्षण
४) रेशमाबाई संतोष अहिरे, उ.वय-६२, धंदा-घरकाम,
१ ते ४ सर्व रा. गोताणे, ता.जि.धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कुणीही नाही** ........**सामनेवाला**

कै. प्रदिप संतोष अहिरे ........**मयत**

कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी
Legal Heirship Certificate

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. प्रदिप संतोष अहिरे यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि. कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) कोर्ट नं. १ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. ०७/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तकार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. प्रदिप संतोष अहिरे यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

आदशावढून
स्थळ : धुळे
दि.२७/०६/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)

**क.लिपीक** — **दिवाणी न्यायालय, धुळे**
**सहायक अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय, धुळे**

---

अॅड. अनिल के. गवळी
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. चिफ ज्युडि. मॅजि. सो. धुळे यांचे कोर्टात**

फौ. कि. अर्ज नं. ५१७/२०२३

संभाजी धोंडीबा गवळी उ.व.:-५६, कामधंदा:-मजुरी
रा.:- तिखी ता. जि. धुळे ........**अर्जदार**

**विरुध्द**

म. निबंधक सो.
जन्म-मृत्यू नोंद कार्यालय,
ग्रामपंचायत, तिखी ता. जि. धुळे ........**सामनेवाला**

**(कु. पुनम संभाजी गवळी हिचा जन्म दि. ०१/०२/२००७)**

ज्याअर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. चिफ ज्युडि मॅजि. सो. धुळे येथे दि. २३/०६/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं. / २०२३ हा वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) प्रमाणे अर्जदार यांची मुलगी कु. पुनम संभाजी गवळी हिच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०३/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही

हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २३/०६/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. धुळे यांचे न्यायालयात**
**सहायक अधिक्षक** — **मे. मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे**

## न्यूज कॉलम

### आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**धुळे ।** किड्डू प्ले स्कुल मध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेमध्ये सर्व मुलांनी आषाढी एकादशी निमित्त जिवंत देखावा सादर केला. मुलांनी विठ्ठलाच्या नामाचा गजर करत शाळेबाहेर उत्साहाने दिंडी काढण्यात आली. हा कार्यक्रम किड्डू प्ले स्कुल, वृंदावन कॉलनी, देवपूर येथे शाळेत साजरा करण्यात आला. आयोजन स्कुलचे चेअरमन प्रा.डॉ. जयेश गाळणकर यांनी केले. यामध्ये मुख्याध्यापिका रश्मी गाळणकर, शितल परमार, पुर्वा शर्मा, सर्व शिक्षक यांनी मेहनत घेतली.

### गळफास घेऊन मुलाची आत्महत्या

**धुळे ।** शिरपूर तालुक्यातील ताजपुरी येथील कैलास एकनाथ बोरसे (वय ४१) या तरुणाने त्याच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी दुपारी घडली. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषीत केले. त्याच्या आत्महत्येमागील कारण समजू शकलेले नाही.

# मान्सूनची हजेरी ; शेतकऱ्यांची बी -बियाणे खरेदीसाठी लगबग

**धुळे । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून दडी मारुन बसलेल्या मान्सुनने जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात हजेरी लावली आहे.त्यामुळे जिल्ह्यातील बळीराजा सुखावला असुन खरीप हंगामाच्या पेरणीसाठी बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकरी बांधवांनी बी -बियाणाच्या दुकानांमध्ये गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

लांबलेल्या पावसाच्या आगमनामुळे बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद पसरल्याचं चित्र सध्या आहे. काही भागात झालेला पहिलाच पाऊस हा पेरणीयोग्य झाल्याचं म्हटलं जात आहे. राज्यात मान्सून दाखल झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शेतीची मशागत देखील करुन ठेवली होती. तसेच पेरणीसाठी बियाणे देखील खरेदीस गर्दी केल्याचे दिसुन येत आहे. आता शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे ती दमदार पावसाची. येत्या काही दिवसामध्ये जर पावसाचा जोर असाच राहिला तर लवकरच शेतकऱ्यांना पेरणी करता येणार आहे येत्या चार पाच दिवसांत राज्यात चांगल्माया प्रमाणात न



### पेरणीची लगबग, शेतकऱ्यांना दिलासा

गेल्या दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे खोळंबलेली भात पेरणी सुरू झाली आहे. इगतपुरी-त्र्यंबकेश्वर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भात पिकाचे उत्पादन घेतले जाते. जून महिन्यात पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात पेरणी सुरू होत असते. मात्र यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतीत होता. अखेर पावसाने सर्वदूर हजेरी लावली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून भात पेरणीला वेग आला आहे. त्याचबरोबर इतरही पिकांची लागवड केली जात आहे. रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत शेतात पाणी साचले असून नाले देखील वाहू लागले आहेत.

### काही भागात जोरदार पाऊस तर काही ठिकाणी पावसाची प्रतिक्षा

राज्याच्या काही भागात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. काही भागात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे, तर कुठे अद्यापही पावसाची प्रतिक्षा कायम आहे. मुंबईत गेल्या चार दिवसापासून सुरु असलेला पावसाचा जोर काही प्रमाणात कमी आला आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या अंदाजानुसार आजही राज्यात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आज कोकण विभागात काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट द्यात आला आहे. तर पश्चिम महाराष्ट्रातही जोरदार पावासाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

सक्रिय होणार असल्याचं हवामान खात्याकडून सांगण्यात येत आहे. तर राज्यातील अनेक जिल्ह्यांना हवामान खात्याकडून ऑरेंज आणि यलो अर्लट देखील देण्यात आला आहे. राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय झाल्याने उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना देखील दिलासा मिळाल्याचं पाहायला मिळत आहे.

गेल्या महिनाभरापासून शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत होते. अखेर जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूननं जोरदार हजेरी लावत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. त्यामुळे इगतपुरीसह त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अनेक भागांत भात पेरणीला सुरुवात झाली आहे. मागील दोन दिवसांत जिल्ह्यातील बहुतांश भागांत पेरण्या खोळंबल्या होत्या, त्या पूर्ण होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी देखील समाधान व्यक्त केलं आहे.

# नाशकात बकरी ईदचा सण उत्साहात



**नाशिक । प्रतिनिधी**

ईद-उल-अज्हा अर्थात बकरी ईदचा सण शहर परिसरात काल (दि.२९) धार्मिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान ऐतिहासिक शहाजहानी ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज पठणास हजारो भाविक उपस्थित होते. तत्पूर्वी शहर परिसरातील सुमारे ६० मशिदीतून नमाज पठण झाले.

ईदगाह येथील नमाजाचे नेतृत्व मुस्लिम बांधवांचे धर्मगुरू तथा खतीबे शहर हाफिज हिसामुद्दीन अशरफी यांनी केले. तत्पूर्वी जामेआ अहले सुन्नत सादिकुल उलूम अरेबिक कॉलेजचे प्राचार्य मौलाना मेहबूब आलम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तदनंतर सुमारे दहा वाजता नमाजाच्या विधीस सुरुवात झाली. नंतर खुतबा, फातेहा व सलाम गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी माजी महापौर दशरथ पाटील, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त सिद्धेश्वर धुमाळ, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, शेखन खतीब, हसीब काझी, शहाबुद्दीन शेख, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष रफिक सय्यद, हसीब खान, नईम खतीब, फारुक पठाण, ॲड. परवेज मनियार, अब्दुल कादिर पठाण, नदीम खान आदी उपस्थित होते. दरम्यान काल ईदच्या दिवशी हा कत्तलखाना बंद ठेवण्यात आला होता. तसेच कत्तलखान्याजवळ पोलीस बंदोबस्त तैनात होता. परंतु अनेक घरांमध्ये बोकडांची कुर्बानी देण्यात आली. दरम्यान भद्रकाली हद्दीत मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात होता. भद्रकाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक दिलीप ठाकूर परिस्थितीवर लक्ष ठेऊन होते.

# परराज्यात जाणारा ११ लाखांचा मद्यसाठा पकडला!

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**



पिंपळनेर हद्दीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने धडक कारवाई करत परराज्यात जाणारा ११ लाख ३५ हजारांचा विदेशी मद्यसाठा जप्त केला. या कारवाईत वाहनासह एकूण २० लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

बकरी ईद व आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, संचालक सुनिल चव्हाण, नाशिक विभागाचे उपायुक्त बी.एच. तडवी, राज्य उत्पादन शुल्क धुळे विभागाचे अधिक्षक मनोज शेवरे यांनी सतर्क राहण्याच्या सूचना विभागातील अधिकार्यांना दिल्या आहेत. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क, साक्री विभागाचे दुय्यम निरीक्षक बी.एस.चोथवे हे काल रात्री गस्तीवर असताना त्यांना पिंपळनेर दहिवेल रोडवर ढवळीविहीर गावाजवळ संशयीत वाहन (एमएच ०४/ईबी ३०६२) उभे दिसले. त्यांनी या वाहनाची तपासणी केली असता वाहनात विदेशी मद्य व बिअरचे एकूण २२९ बॉक्स आढळून आले. त्याची किंमत ११ लाख ३५ हजार ५६० रुपये असून सदर माल परराज्यात विक्रीसाठी नेण्यात येणार होता. यावेळी श्री.चोथवे यांनी ९ लाखांच्या

वाहनासह एकूण २० लाख ३५ हजार ५६० रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्क, साक्री विभागाचे दुय्यम निरीक्षक बी.एस. चोथवे, शिरपूरचे निरीक्षक डी.पी.नेहूल, धुळे भरारी पथकाचे निरीक्षक डी.एल. दिंडकर, दुय्यम निरीक्षक आर.आर.धनवटे, एस.एच. शिंदे, ए.सी.मानकर, एस.एस. आवटे, पी.बी. अहिरराव, आर.बी. लांजेकर, सहायक दुय्यम निरीक्षक श्री.निकुंभे, श्री.फुलपगारे तसेच जवान गोरख व्ही.पाटील, श्री.गोसावी, प्रशांत बोरसे, केतन जाधव, वाहन चालक रवींद्र देसले, राज्य उत्पादन शुल्क विभाग, धुळे यांच्या पथकाने केली. तपास दुय्यम निरीक्षक श्री.चोथवे करीत आहेत. दरम्यान, अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक व विक्री संदर्भात कोणतीही माहिती अथवा तक्रार असल्यास नागरीकांनी टोल फ्रि क्र.१८००२३३९९९९ व व्हॉट्सॲप क्र. ८४२२००११३३, दुरध्वनी ०२५६२-२९७४८४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क, साक्री विभाग, धुळेतर्फे करण्यात आले आहे.


### सीए शाखेतर्फे सीए दिनानिमित्ताने कार्यक्रम

**धुळे ।** दिल्ली स्थित दि इन्स्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया च्या पश्चिम विभागीय धुळे शाखेच्या वतीने सीए दिनानिमित्त दिवसभर कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. सीए इन्स्टिट्यूटची या संस्थेची स्थापना ०१ जुलै १९४९ रोजी संसदेत विशेष कायदा करून करण्यात आली आहे. त्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहे. सीए इन्स्टिट्यूट ही जगात अकाउंटिंग क्षेत्रात काम करणारी सर्वात जास्त सभासद असणारी २ नंबरची संस्था आहे. यानिमित्त धुळे सीए शाखेमार्फत सीए सभासदांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवारी दि. ०१ जुलै रोजी धुळे सीए शाखेच्या वतीने सकाळपासून विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.

# राज्यातील नवीन गुंतवणुकीत नाशिकला पुन्हा ठेंगाच का?

### निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांचा राज्य सरकारला सवाल

**नाशिक । प्रतिनिधी**



काल महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळांमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये ४२ हजार कोटीच्या गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यामध्ये पुन्हा नाशिकचा कुठेही समावेश नसल्याने आमची निश्चितच नाराजी ही असली तरी सुद्धा महत्त्वाची व सकारात्मक बाब म्हणजे गेल्याच महिन्यात निमामार्फत आयोजित केलेल्या निमा पॉवर २०२३ या प्रदर्शनामध्ये उद्योग मंत्र्यांनी जाहीर केलेल्या इलेक्ट्रॉनिक-इलेक्ट्रिक क्लस्टर मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर या एकाच क्लस्टरमध्ये या संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या बेचाळीस हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीपेक्षाही अधिक गुंतवणूक ही होणे अपेक्षित असल्याने आम्ही निमा म्हणून त्या क्लस्टरला चालना देण्याकडे प्राधान्याने लक्ष देत आहोत. त्याचा सर्वंकष पाठपुरावा राज्य शासनाकडे आमचा सुरू आहे. यामध्ये सर्व नाशिककर नागरिकांनी, सर्व औद्योगिक व इतरही संघटना, प्रशासन व सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनीही सहभागी होऊन आम्हास सहकार्य करावे व बळ देऊन याचा ठोस पाठ पुरावा करून याला चालना देण्याची खरी गरज आता आहे असे वाटते. अशी प्रतिक्रिया निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांनी दिली आहे. दरम्यान यापुढे जावून नासिक जिल्ह्यामध्ये एक मोठी गुंतवणूक असलेला उद्योग आणण्याचा निमाचा प्रयत्नही सुरूच राहणार असल्याचे बेळे यांनी म्हटले आहे.

# नाशिक शहर भाजपा अनुसूचित जाती मोर्चातर्फे सामाजिक विभागाच्या उपायुक्तांना निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक शहर भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने विविध समस्यांबाबत सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश उपायुक्तांना भाजपा शहर प्रभारी प्रा. कुणाल वाघ व भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे शहराध्यक्ष शशांक हिरे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

निवेदनात सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत समाविष्ट असलेल्या विविध महामंडळात त्वरित अर्थसहाय्य मिळवून देऊ बेरोजगार रोजगारी दूर करण्यास मदत करावी, वस्तीगृहा बाहेर राहिलेल्या विद्यार्थ्यांना त्वरित निर्वाह भत्ता देण्यात यावा, कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड योजना पूर्वत सुरू करण्यात यावी, नाशिक महानगरात सामाजिक न्याय संकुल उभारून स्पर्धा परीक्षा केंद्रात जागा उपलब्ध करून द्यावी आदी विविध समस्यांबाबत चर्चा करून निवेदन देण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेवक शाम बडोदे, गजानन रणबावळे, मदन निकम, अनिल मोरे, लक्ष्मण पगारे, दशरथ गांगुर्डे आदी उपस्थित होते.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**साक्री । प्रतिनिधी**

भविष्यात येणाऱ्या संकटांना घाबरून न जाता ज्येष्ठांचा व शिक्षकांचा सल्ला घेऊन तसेच अथक परिश्रम करून विद्यार्थ्यांनी यश संपादित करावे व स्वतः चे उज्वल भविष्य स्वतः घडवावे असे मत विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश रामराव पाटील यांनी व्यक्त केले.

साक्री येईल विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री येथे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इयत्ता १०वी व १२वी च्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व कृतिशील प्राचार्य व मुख्याध्यापकांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. विद्या विकास मंडळातील



विविध विद्यालयात दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश रामराव पाटील व अध्यक्षा ताईसो मंगलाताई सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा ताई सौ मंगलाताई सुरेश पाटील, श्री अशोक ठाकरे, सतीश देसले, प्रशासकीय अधिकारी डॉ डी एल तोरवणे प्रसंगीउपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात बोलताना सुरेश पाटील यांनी भविष्य उज्वल करण्यासाठी तसेच यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनापासून प्रयत्न करावेत असा देखील सल्ला प्रसंगी दिला. तालुक्यातील जनसामान्यांच्या पाल्यासाठी उच्च शिक्षणाची द्वारे खुली व्हावी म्हणून विद्या विकास मंडळ संस्था कार्य करते. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी यशस्वी झाल्यास फक्त कुटुंबाचे नव्हे तर संस्थेचे देखील मनोबल वाढते असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. प्रसंगी रिया संजय कुवर, भावेश महेंद्र देसले या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या यशासाठी नेहमी तत्पर असणाऱ्या संस्थेतील प्राचार्य व मुख्याध्यापकांचा सत्कार देखील प्रसंगी करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा के एस बच्छाव यांनी केले.सदर कार्यक्रमास दहावी बारावीतील गुणवंत विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# हस्ती गुरुकुल शाळेच्या बाल वारकऱ्यांची विज्ञान वारी पालखी सोहळा संपन्न

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती गुरूकुल मराठी माध्यम शाळेच्या बाल वारकऱ्यांचा आषाढी एकादशी निमित्ताने अनोखा विज्ञान वारी पालखी सोहळा दि. २७ जून २०२३ रोजी दाउळ शिवार कँपस् येथे उत्साहात संपन्न झाला.



यावावत वृत्त असे की, हस्ती स्कूल परिवाराने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीवा वृद्धींगत व्हाव्यात, सोबतच विज्ञानाची आवड निर्माण व्हावी; व अवघड वाटणारा विज्ञान विषय सोपा व सुलभ व्हावा, याकरिता शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाखाली सन २०२३-२४ हे शैक्षणिक वर्ष विज्ञान वर्ष म्हणून घोषीत केले आहे. याकरिता विद्यार्थ्यांसाठी हस्ती स्कूल परिवार तर्फे संपूर्ण वर्षभर विज्ञान विषयाबाबत विविध अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या अनुषंगाने आषाढी एकादशीच्या औचित्यावर ' हस्ती गुरूकुल ' शाळेच्या बालकांसाठी ' विज्ञान वारी पालखी सोहळा ' आयोजित करण्यात आला. यादिवशी हस्ती गुरूकुलच्या विद्यार्थ्यांनी पंढरपूरच्या पांडुरंगाचे वारकरी व संताच्या वेशभूषा साकारल्या. विशेषतः या बाल वारकऱ्यांसाठी हस्ती गुरूकुल शिक्षक रविंद्र कोळी यांनी विद्यार्थी व सहकारी शिक्षकांच्या मदतीने अनोखी विज्ञान पालखी तयार करून सजवली होती! या पालखीत विठ्ठल रूक्मिणी यांची प्रतिमा व विज्ञान प्रात्यक्षिक साहित्य - चंचुपात्र, नरसाळे, परीक्षा नळी, स्पिरीटचा दिवा, तिवई स्टँड, आणि तुळस ठेवली होती. ह्या सजवलेल्या पालखीला विद्यार्थी वारकऱ्यांनी आपल्या खांद्यावर घेऊन वारीत सहभागी झाले. सदरच्या पालखी सोहळ्याला दाउळ शिवार कँपस् शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून सुरूवात झाली. व समारोप प्रांगणात मोठ्या थाटात करण्यात आला. यांप्रसंगी विद्यार्थी नक्ष भाऊसाहेब बोरसे - इ. ४ थी - कोंढाणा, याने संतांचे कार्य व पंढरपूर वारी याबाबत माहिती सांगितली. तसेच विद्यार्थिनी ऋचिता चेतन पाटिल - इ. ४ थी - कोंढाणा, हिने सुमधुर आवाजात अभंग गायन सादर केले. वरील आषाढी एकादशी व विज्ञान वर्ष निमित्ताने आयोजित अनोखा विज्ञान वारी पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी हस्ती गुरूकुल मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांचे मार्गदर्शनाखाली विज्ञान विषय शिक्षक शाकिर खाटीक, रविंद्र कोळी, प्रविण माळी, दिनेश पाटिल, पंकज जाधव शिक्षिका स्वाती बागुल, क्रांती बोरसे, ज्योती महाजन यांनी परिश्रम घेतले.

ADMISSION शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था ADMISSION
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade
वडेल रोड, एमएसईबीजवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc | B.C.A | M.M.S./ M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्या S.Y. Bsc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क – प्रा. ललिता निकम – ८८६२०४४७११ प्रा. जागृती पाटील – ७८८७९३४३६५
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक, कोड नं. 5299A
B.A., B.C.A., B.Sc., M.A. M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल
संपर्क – प्रा. हर्षल पाटील – ९४२१२८३५७७ श्री. नितेश पाटील – ९९२२११६४३८
प्रा. भुषण पाटील – ७७०९१००७९८
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. कोड नं. 2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुलॉजी, मायक्रो बायोलॉजी / बी.फार्म / बी.ए.एम.एस / बी.डी.एस. / एम.बी.बी.एस.
– संपर्क – प्राचार्य डॉ. के. बी. पाटील ९४२२२८८५१८, सौ. शारदा पाटील – ९४२३४९६३४४
प्राचार्य. डॉ. आर.बी. पवार – ९४२०३७५७३५
प्रा. डॉ. योगेश बोरसे – ९४२३३७८९३६ श्री. हर्षल पाटील – ९४२१२८३५७७

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र



# धुळ्यात ब्रांच मॅनेजरला ठाकरे गटाच्या रणरागिणींनी दिला चोप








धुळे

। शहरातील पारोळा रोड येथे खाजगी बँकेतील मॅनेजर महिला कर्मचारी यांच्यासोबत अश्लील चाळे करत असल्याच्या तक्रारी होत्या. यामुळे ठाकरे गटाच्या महिला शिवसैनिकांनी भर रस्त्यात चोप दिला. धुळे शहरातील खासगी बँकेतील मैनेजर हा महिला कर्मचाऱ्यांना अश्लील चॅटिंग करत होता. इतकेच नाही तर त्या महिलासोबत अश्लील चाळे करत असल्याने बँकेतील महिला कर्मचाऱ्यांनी ठाकरे गट शिवसैनिकांशी संपर्क साधला. शहरातील ग.नं. ६ पारोळा रोड येथील रिलायन्स लाईफ इन्शोरन्स या खाजगी कंपनीत नितीन सोमनाथ पाटील (३५) रा. निकुंभे, ता.धुळे, ह.मु. हजारे कॉलनी, जीटीपी स्टॉपजवळ, देवपूर, धुळे हा असिस्टंट ब्रँच मॅनेजर म्हणून कामाला आहे. याच कंपनीत एक विवाहित महिलाही नोकरीवर आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तो या महिलेला ऐनकेन प्रकारे त्रास देऊन अंगलट करण्याचा प्रयत्न करत होता. दिवसेंदिवस त्याची हिंमत वाढतच होती. त्यातच त्याने 'मुझे प्यार हो गया' असा मॅसेज महिलेला पाठविला. यामुळे महिलेचा संयम सुटल्याने याबाबत थेट शिवसेनेच्या कार्यालयात तक्रार दिली. त्यानंतर शिवसेनेच्या महिला पदाधिकारी हेमाताई हेमाडे, शुभांगीताई पाटील यांनी शिवसैनिकांसोबत थेट ग.नं.६ मधील कंपनीचे कार्यालय गाठले. आणि असिस्टंट मॅनेजर नितीन पाटील याला कार्यालयातच चोप देण्यास सुरवात केली. त्यानंतर त्याला ओढून आझादनगर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. यावेळी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. आझाद नगर पोलीस ठाण्यात पीआय प्रमोद पाटील यांच्याकडे शिवसेनेच्या रणरागिणींनी कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या ब्रांच मॅनेजरच्या अश्लिल वर्तवणुकीला वैतागून यापुर्वी काही महिलांनी काम सोडल्याचेही सांगण्यात येत आहे. या ठिकाणी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी रिलायन्स इन्शुरन्स कंपनीचे कार्यालय गाठत संबधीताला जाब विचारला असता, तो कर्मचारी दारूच्या नशेत कामावर होता.महिला पदाधिकाऱ्यांशी अरेरावी करत माझ कोणीच काही बिघडवु शकत नाही अस म्हणताच महिला पदाधिकाऱ्यांनी त्याला चोप देत कार्यालया बाहेर आणले या ठिकाणी जमलेल्या सर्व शिवसैनिकांनी त्याला शिवसेना स्टाईल ने दणका देत, महानगर प्रमुख धीरज पाटील यांनी आझाद नगर पोलीस स्टेशनला सुचित केले, पोलीसांना विलंब होत असल्या कारणाने शिवसैनिकांनी ग.न.७ मधुन संबधीत नराधमाची आझाद नगर पोलीस स्टेशन पर्यंत ढिंड काढली, यावेळी पीडीत महिला कर्मचारी व महिलेचा पती यांनी संबधीता विरोधात फिर्याद नोंदवली, या संदर्भात महानगर प्रमुख धीरज पाटील यांनी नाशिक विभागाचे वरिष्ठांशी संर्पक साधुन संबधित कर्मचाऱ्यांला निलंबित  करण्याची मागणी केली, या संबधीचे पत्र लागलीच धुळे येथील कार्यालयाला पाठविण्यात येईल असे आश्वासन विभागीय जनरल मॅनेजर यांनी दिले. त्याला ओढून आझादनगर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. यावेळी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. आझाद नगर पोलीस ठाण्यात पीआय प्रमोद पाटील यांच्याकडे शिवसेनेच्या रणरागिणींनी कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या ब्रांच मॅनेजरच्या अश्लिल वर्तवणुकीला वैतागून यापुर्वी काही महिलांनी काम सोडल्याचेही सांगण्यात येत आहे.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. १ जुलै २०२३



# सुरुची इंग्लिश स्कूल चिमठाणे येथे पालखी सोहळा संपन्न








चिमठाणे । आषाढी एकादशी निमित्ता ने सुरुची इंग्लिश मेडीयम स्कूल चिमठाणे येथे विद्यार्थ्यांनी दिंडी व पालखी सोहळ्याची मिरवणूक काढली विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी यांचा देखावा केला होता. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अखंड चालणारी वारकरी संप्रदायचे भक्तिमय वातावरण गावात निर्माण केले. चिमुकल्यानी परिधान केलेला वारकरी पोशाख नेहरू शर्ट, धोतर ,गळ्यात तुळशी माळ,हातात टाळ, असा वेष परिधान करत भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा आयोजित करण्यात केला. वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक आणि विठू नामाचा गजर अशा वातावरणात शहर आणि परिसरातील शाळेत दिंडी सोहळा रंगला. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी आकर्षण ठरले. बाल वारकरी दिंडी सोहळ्याचे नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत केले. या मिरवणुकीमध्ये लहान मुलांनी केलेले देखावे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. अनेक महिला डोक्यावर कलश व ज्ञानेश्वर ग्रंथ घेऊन मिरवणुकीमध्ये सहभागी झाल्या होत्या. 'जय जय राम कृष्ण हरी ,रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी, ज्ञानोबा माऊली तुकाराम' या अभंगांचे गायन करून टाळ व वीणा यांच्या तालावर ठेका धरत नृत्य तसेच विठ्ठल फुगडी खेळून प्रत्यक्षात श्रीक्षेत्र पंढरपुरातील भक्तिमय वातावरण बॉईज टाऊन शाळेच्या क्रीडागंणावर निर्माण केले. . राज्याच्या कानाकोप-यातून लाखोंच्या संखेने भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दक्षिण काशी समजल्या जाणा-या तीर्थक्षेत्र पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत. हा वैष्णवांचा मेळा खूप मोठा असून या वारीत मध्ये सर्व साधु-संतांच्या पालख्या येत असतात. अशा विठ्लाचा सोहळा अनेकांना अनुभवता येत नाही. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना पंढरपूर अनुभवण्यासाठी शाळेतच दिंडी सोहळा आयोजित केला जातो. विद्यार्थी आणि शिक्षकानी पारंपारिक वारकरी वेशभूषा, तुळशी व भगवद्धज घेऊनअभंगाच्या ठेक्यावर नृत्य व फुगडीचा आनंद घेऊन या नयनरम्य सोहळ्यात आपली भक्ती अभिव्यक्त केली आषाढी एकादशी चे औचित साधतं दिंडी सोहळा गावातून निघाला .श्री विठ्ठलाचे स्मरण करत विध्यार्थ्यांनी ताळ,मृदंग, विठ्ठलाचे भजन व हरीनामाचा गजर करत गावातून शाळेपासून दिंडी व पालखी हरीनामा चा जागर करत बस स्थानका पासून मिरवणूक डॉ. बबासाहेब अंबेडकर चौक, करत संतोषी माता मंदिर कासार गल्ली कालिका माता मंदिर ,हनुमान मंदिर, नंतर विध्यार्थी भक्तिमय दिंडी ही पांडुरगांचा म्हणजे विठ्ठलं मंदिरात दिंडी व पालखी ने विठू माऊली चे दर्शन घेत भवानी मातेचा मंदिराकडे प्रस्थान करत शाळेत दिंडी पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली. हा दिंडी सोहळा उत्सवात पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्यध्यापक सोनवणे, श्रीमती प्रतिभा देसले,भारती पाटील,रुपाली कासार,प्रियंका गिरासे, योगिता कोळी,स्वाती जैन,श्रुती जैन,शीतल पाटील,बडगुजर, प्राची कुलकर्णी,दीपाली गिरासे,रोशनी कोटकर, सुनंदा देवरे,शीतल पाटील,गीतांजली चौधरी,अर्चना गीते, जयश्री शिरसाठ,दीपाली निकुम, प्रजून कोळी सर,स्वप्नील महाले, गिरासे सर,आदी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले व उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

संकलन : प्रमोद शिंपी